## प्रकरण : १

१.१ प्रस्तावना

१.२ समस्येचे विधान

१.३ विशिष्ठ पदांच्या व्याख्या

१.४ गृहीतके

१.५ समस्येची व्याप्ती व मर्यादा

१.६ संशोधनाच्या अभ्यासाची उद्दिष्टे

१.७ परिकल्पना

१.८ प्रकरणीकरण

# :: प्रकरण - १ ::

## प्रस्तावना :

शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये शिक्षकाला सर्वांगाने आणि कृतिशील भूमिका बजवावी लागते. शिक्षकाला अनेक कार्ये करावी लागत असतली तरी " अध्यापन " हेच प्रमुख कार्य आहे. व याच कार्यावरून त्याला " अध्यापक " किंवा " शिक्षक " हे नामाभिधान प्राप्त झाले आहे .

## अध्यापन म्हणजे काय ?

अध्यापनाच्या व्याख्या अनेक आहेत. बी. ओ. स्मिथ[१९८४] यांनी अध्यापनाच्या व्याख्यांचे चार प्रकार केले आहेत. ते असे

१] वर्णनात्मक व्याख्या . २] परिणामकारकता धिष्ठित व्याख्या.
३] हेतू / उद्दिष्टाधिष्ठित व्याख्या. ४] आदर्श व्याख्या.

वर्णनात्मक व्याख्यांमध्ये शिक्षक जेव्हा "अध्यापन" करतो तेव्हा ज्या ज्या कृति, त्या कृतीवर भर दिलेला असतो.

परिणामकारकता धिष्ठितव्याख्यांमध्ये शिक्षकांच्या ज्या कृति-मुळे प्रत्यक्ष अध्ययन घडते, त्याच कृतीचा अध्यापनात समावेश केला जातो.

हेतुनुसारी व्याख्येत " हेतू पूर्ण कृति " या अध्यापनाच्या वैशिष्टयाला महत्व आहे .

आदर्शी व्याख्या अध्यापनासाठी आवश्यक असणा-या " नैतिक अटी " च्या पूर्ततेस प्राधान्य देतात. या व्याख्येनुसार अध्यापन म्हणजे अभिसंधान [Conditioning ] दहशतवाद Intimidation, प्रचार [ propoganda. ] किंवा मतांतःप्रवेशन नव्हे .Indoctrination या व्याख्यानुसार प्रशिक्षण हे अध्यापनाचा भाग होऊ शकेल. परंतु अध्यापन हे प्रशिक्षणापेक्षा व्यापक असून ते कौशल्यापेक्षा विचाराला अधिक चालना देते असे मानले जाते .

वरील व्याख्यावरून हे लक्षात येईल की अध्यापनामध्ये "पूर्व - क्रियात्मक " व "आंतर क्रियात्मक" अशा दोन अवस्था आहेत. या दोन्ही अवस्थेत शिक्षक विविध प्रकारचे निर्णय घेत असतो. पाठाचे नियोजन करताना जे निर्णय शिक्षक घेत असतो त्याला "पूर्व क्रियात्मक निर्णय" असे म्हणतात. या उलट अध्यापन चालू असताना वर्गातील परिस्थितीनुरूप जे निर्णय घ्यावे लागतात. त्यांना " आंतर क्रियात्मक " निर्णय" म्हणतात. या दोन्ही प्रकारच्या निर्णयांचा शिक्षकांच्या अध्यापनाच्या वर्तनावर परिणाम होतो.

त्यामुळे जर शिक्षकांचे वर्गातील प्रत्यक्ष अध्यापन बदलावयाचे असेल तर त्याचे पूर्व क्रियात्मक व आंतर क्रियात्मक निर्णय घेण्याचे वर्तन बदलावे लागेल. असे असले तरी आजच्या शिक्षक प्रशिक्षणामध्ये शिक्षकाच्या निर्णय प्रक्रिये ऐवजी त्याच्या बाह्य वर्तन बदलावरच अधिक भर दिला जातो. एकच एक साचेबंद अध्यापन पध्दतीवर प्रभुत्व मिळविण्याच्या दृष्टीने सरावपाठ या घटकाव्दारे प्रशिक्षण दिले जाते. सर्व साधारण पणे ही साचेबंद पध्दती म्हणजे हर्बार्टची व पंचपदी किंवा ब्लूमच्या मूल्यमापन व हर्बार्टची पंचपदी यांच्या संमिश्र

साचातून तयार होणारी पध्दती. या साचेबंद पध्दतीतून पुढील सराव पाठांच्या योजनांचे आयोजन केले जाते.

१] व्याख्यान :- शिक्षक प्रशिक्षणामध्ये सराव पाठाच्या नियोजनानातील प्रारंभीचा प्रमुख भाग म्हणून व्याख्यानाचे आयोजन केले जाते. यामध्ये अध्यापनातील तात्त्विक कामाची चर्चा होते त्यानंतर पाठाची उद्दिष्ठे कोणती व त्याची स्पष्टीकरणे कशी लिहावयाची याची सोदाहरण चर्चा केली जाते. त्यानंतर पाठाच्या पाय-या समजावून दिल्या जातात.

२] दिग्दर्शन पाठ :- मार्गदर्शक प्राध्यापकांनी एखादया वर्गावर एखादया विषयाचा प्रत्यक्ष पाठ घेऊन दाखवावा लागतो या पाठाचे निरीक्षण विद्यार्थी-शिक्षकास करावयास सांगितले जाते. पण नंतर प्रशिक्षणार्थ्यांचे शंका समाधान करावे लागते.

३] पाठ टाचण तयार करणे :- दिग्दर्शन पाठानंतर प्रत्येक विद्यार्थी-शिक्षकाने आपल्या विषयाचा एखादा घटक निवडून मार्गदर्शक प्राध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली त्या घटकाचे टाचण तयार करावे लागते. एकदा काढलेल्या टाचणांत मार्गदर्शक प्राध्यापक दुरूस्त्या फेरबदल सुचवितात त्याप्रमाणे दोन तीन वेळा टाचण काढल्यानंतर पाठाचे पक्के टाचण तयार होते.

४] प्रत्यक्ष सराव पाठ :- पाठाचे पक्के टाचण मार्गदर्शक प्राध्यापका -कडून मान्य झाल्यानंतर त्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थी-शिक्षकास तो पाठ प्रत्यक्ष त्या वर्गावर घ्यावयास सांगितला जातो. या पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापकांकडून निरीक्षण केले जात.

५] <u>प्रत्याभरण</u> :- पाठ संपल्यानंतर मार्गदर्शक प्राध्यापक पाठातील त्रुटीसंबंधी विद्यार्थी शिक्षकांशी चर्चा करतात व दोष कमी करण्याविषयी मार्गदर्शन करतात.

पाठ नियोजनातील वरील पाचही पाय-यामध्ये विद्यार्थी शिक्षकाच्या अध्यापन विषयक विचारात फारशी चालना मिळत नाही. शिवाय हर्बार्ट पंचपदी किंवा उद्दिष्टानुसार अध्यापन पध्दतीचा साचेबध्द पणे सराव करायला या प्रशिक्षणात महत्व दिले जाते. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकाचा वैचारिक सहभाग कमी पडतो.


परंपरेने चालत आलेल्या या कार्यक्रमामध्ये नोंद घेण्यासारख्या एकाच नविन तंत्राची भर १९७० नंतरच्या काळात पडली. ती म्हणजे " सूक्ष्म अध्यापन " हे तंत्र होय. सूक्ष्म अध्यापनात क्लिष्ट व गुंतागुंतीच्या अध्यापन प्रक्रियेचे सुटया अध्यापन कौशल्यात रूपांतर केले जाते व ऐकेक कौशल्य क्रमाक्रमाने शिकविले जाते. मात्र यानंतर देखील प्रामुख्याने बाहय वर्तनावर , वर्तन बदलावर दिला जाते. या तंत्रामुळे अध्यापन अध्ययन प्रक्रियेचे यांत्रिकी करण झाले आहे, अशी टीका केली जाते. आणि याचा परिणाम म्हणून अध्यापनातील बौध्दीक व सर्जनशील बाजूना वाव मिळत नाही. विशिष्ट कौशल्याच्या प्रशिक्षणामुळ शिक्षकाच्या कल्पना शक्ती, निर्णय शक्ती, तांत्रिक विचार करण्याची शक्ती उपेक्षिल्या जातात. थोडक्यात, अध्यापन कौशल्य व वर्तन यांच्या व्याख्या एकांगी व अपु-या - रहातात.

शॉव्हेल सन [ १९७३ ] याच्या मते तर बाहय अध्यापन कौशल्ये ही मूलभूत कौशल्ये नसून शिक्षकाचे मूलभूत कौशल्य म्हणजे -

शिक्षकाचे निर्णय घेण्याचे कौशल्य होय. आणि या मूलभूत कौशल्यामध्ये फारसे बदल न झाल्यामुळे शिक्षक प्रशिक्षणामुळे विद्यार्थी शिक्षकांच्यात अध्यापनात झालेली सुधारणा ही तात्पुरती होते. प्रत्यक्ष शाळेत गेल्यानंतर या पध्दतीनुसार विद्यार्थी शिक्षक शिकवतीलच याची खात्री देता येत नाही. यासाठी शिक्षक प्रशिक्षणाच्या काळात शिक्षकाच्या विचार प्रक्रिया व " निर्णय कृती " यावर भर दिला पाहिजे.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे विचार प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी " कृतिपूर्व" विचार आणि " आंतर प्रक्रियात्मक " विचार यांचा एकमेकांवर कसा प्रभाव आहे हे क्लार्क आणि पीटरसन [ १९७८ ] यांनी आपल्या " विचार प्रक्रिया आणि कृती " या प्रतिमानावरून दाखवून दिले आहे. आकृति क्रमांक १.१ मध्ये हे प्रतिमान दर्शविले आहे .

" विचार प्रक्रिया आणि कृति "




आकृती क्र. १.१     क्लार्क आणि पीटरसन [१९७८]

आकृती क्रमांक १.१ मध्ये दाखविलेल्या प्रतिमानानुसार आपणास असे दिसून येते की, शिक्षक विचार व शिक्षक कृती आणि त्यांचे निरिक्षणक्षम परिणाम ही दोन भिन्न क्षेत्रे आहेत.

पहिल्या शिक्षक विचार या क्षेत्रांमध्ये तीन प्रमुख घटक दिसून येतात .

१] शिक्षक नियोजन.
२] शिक्षकाचे आंतर क्रियात्मक विचार व निर्णय .
३] शिक्षकांची मते व सिध्दान्त.

दुस-या क्षेत्रात शिक्षक कृति व त्यांचे निरिक्षणक्षम परिणाम मध्ये तीन प्रमुख घटक दिसतात.

१] शिक्षकांचे वर्गातील वर्तन.
२] विद्यार्थ्यांचे वर्गातील वर्तन.
३] विद्यार्थ्यांचे ज्ञान संपादन.

हया चक्रिय प्रतिमानामुळे आपणास हे घटक कसे एकमेकांवर प्रभाव पाडित असतात हे त्यातील द्विमार्गी बाणांच्या आकृतिवरून दिसून येते.

पहिले क्षेत्र -शिक्षकांच्या विचार प्रक्रिया त्यामध्ये क्लार्क व पीटरसन यांनी असे दाखवून दिले आहे की शिक्षकांचे नियोजन - कृतीपूर्व विचार आणि कृत्योत्तर विचार याचा परिणाम शिक्षकांच्या आंतर क्रियात्मक विचार व निर्णय यावर होतो आणि त्यावरून शिक्षक स्वत:ची मते व सिध्दान्त विकसीत करु शकतात. म्हणून

म्हणून आकृतीतील बाण दुतर्फी असे दाखविले आहेत. तसेच दुस-या क्षेत्रातील घटकही एकमेकांवर परिणाम करतात ते पाहू.

दुसरे क्षेत्र - शिक्षक कृति आणि त्याचे निरिक्षणक्षम परिणाम-

कृतीचा भाग हा मुख्यत: प्रत्यक्ष वर्गाध्यापनात येतो. वर्गामध्ये शिक्षक निश्चितच काही वर्तन करीत असतो, आणि त्याच्या वर्तनाचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम हा निरीक्षण करता येतो. त्यानुसार विद्यार्थ्यांचे वर्तन घडते व हेही निरीक्षण करता येते. या दोन्ही घटकांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या ज्ञान संपादनावर होतो त्याचेही निरीक्षण करता येते. थोडक्यात म्हणजे शिक्षक वर्तन व विद्यार्थी वर्तन आणि विद्यार्थ्यांचे ज्ञान संपादन हे तीनही घटक एकमेकांवर परिणाम करतात व त्यांचे निरीक्षण करता येते. म्हणजेच परस्पर विरोधी अशा क्रियांचा परिणाम आपणांस पहावयास मिळतो.

शिक्षक विचार-प्रक्रिया या क्षेत्रातील शिक्षकनियोजन ही प्रक्रिया शिक्षक प्रशिक्षणांत महत्वाची आहे.

<u>शिक्षक नियोजन महत्वाचे का ?</u>

शिक्षक नियाजन म्हणजे प्रामुख्याने पाठ नियोजन होय. आणि पाठ नियोजनात दोन हेतू साध्य होतात.

१] कोणत्यावेळी कोणत्या कृती करावयाच्या त्याचा कागदावर आराखडा तयार करणे. त्याला पाठ नियोजन म्हणतात. दुसरा भाग म्हणजे मानसीक आराखडा तयार होणे.

२] हा मानसिक आराखडा किंवा प्रतिमा शिक्षकास अध्यापनात मदत करतात. आणि हळूहळू ते अंगवळणी पडते. नियोजनातील वैचारीक दृष्टीकोन पूर्णत: दुर्लक्षित होता. नियोजनाला सुप्त अशी एक दुसरी बाजू आहे असे शिक्षक नियोजनातील अलिकडच्या संशोधनांमध्ये दाखवून दिले आहे. आणि ती म्हणजे मनातील मानसिक आराखडा किंवा प्रतिमा होय. हा मानसिक आराखडा किंवा प्रतिमा शिक्षकाला अध्यापनांत मदत करतात. आणि हळूहळू ते अंगवळणी पडते. अंगवळणी पडलेले हे नियोजन एकदा वर्गात सुरु झाले की वैशिष्ठयपूर्ण रित्या घडले जाते. [शॉव्हेलसन आर. जे. १९८५] सिंगर यांच्या मते शिक्षक नियोजनाची प्रमुख निष्पत्ती म्हणजे एखादे वर्तन अंगवळणी पडणे होय.

कागदाचे टाचण लेखनापेक्षा सुस्पष्ट मानसिक आराखडा किंवा प्रतिमा निर्माण होणे महत्वाचे आहे. परंतु पारंपारिक प्रशिक्षण पध्दतीत पाठ टाचणाला अधिक महत्व दिले जाते. म्हणजेच बाहय वर्तनावर भर दिला जातो. शिवाय ही पाठ नियोजनाची कृती एका विशिष्ठ क्रमाने केली जावी असा आग्रह धरला जातो. हा विशिष्ठ क्रमम्हणजे प्रथम आशयाची उद्दिष्टांच्या संदर्भात निश्चिती केली जाते. उद्दिष्टानुसार अध्ययन अनुभवांच्या परिणामांच्या मापनासाठी मुल्य-मापन पध्दती ठरविली जाते. या नियोजन पध्दतीला एक रेषीय प्रतिमान म्हणतात. हे नियोजनाचे प्रतिमान राल्फ टायलर [१९५०] यांनी प्रथम मांडले व त्यावर औधोगीक निर्मिती प्रणालीच्या तार्किकतेचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो.

डॉ. ब्लूम आणि त्यांचे सहकारी यांनी शैक्षणिक उद्दिष्टांच्या चळवळीद्वारे टायलरच्या प्रतिमानाचा सर्वदूर प्रचार व प्रसार केला. परिणामत: १९७० नंतर मूल्यमापनाधिष्ठित एक रेषीय पाठ नियोजनाची ही पध्दती भारतातील शिक्षक-प्रशिक्षणाच्या कार्यक्रमातील सराव पाठाची

देखील अविभाज्य अंग बनली आहे.

महाराष्ट्रातील विविध शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयात प्रचलित पाठ नियोजनाच्या आराखडयात सर्वसाधारणत: चार प्रमुख स्तंभ दिसून येतात. ते म्हणजे-

१] पाठ्य मुद्दे २] उद्दिष्टे व स्पष्टीकरण ३] अध्ययन अनुभव, व ४] मूल्यमापन हे होत.

या स्तंभा मध्ये पाठ टाचण लिहिताना प्रस्तावना , हेतूकथन, विषय-प्रतिपादन, समारोप [संकलन व उपयोजन] व मूल्य मापन या पाच पाय-यांचा समावेश केला जातो.

पाठनियोजन करताना छात्राध्यापकांनी रेषीय प्रतिमान पध्दतीचा अवलंब करावा असा आग्रह असतो. मात्र या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित होऊ शकतात ते पुढील प्रमाणे -

१] हे प्रतिमान त्यांनी स्वत:हून स्विकारलेले असते की त्यांच्यावर लादले गेलेले असते.

२] पाठ नियोजन करीत असताना विद्यार्थी - शिक्षकांची विचार-प्रकिया ही रेषीय प्रतिमानाने दिलेल्या विचार प्रक्रिये प्रमाणे चालते का ? की अन्य रितीने ?

३] जर ते रेषीय प्रतिमानाची विचार प्रक्रिया अवलंबित नसतील तर ते कोणत्या प्रकारची विचार प्रक्रिया अवलंबितात ?

४] एक रेषीय प्रतिमाना नुसार विचार प्रक्रिया आणि प्रत्यक्ष विद्यार्थी-शिक्षकांची विचार प्रक्रियांचा एकमेकांना अनुरुप नसल्यास विचार प्रक्रियांचा अडथळा निर्माण होतो का ?

५] जर त्यांच्या मूळच्या विचार प्रक्रिया एकरेषीय प्रतिमानापेक्षा भिन्न असतील तर त्यांच्या मूळच्या विचार प्रक्रियेत सुधारणा करून त्याच पध्दतीने पाठनियोजन करण्यास सांगणे अधिक उपयुक्त व परिणाम कारक ठरेल का ?

या प्रश्नांचा शोध घ्यावयाचा असेल तर विद्यार्थी-शिक्षकाच्या पाठनियोजना काळातील विचार प्रक्रिया शोध घ्यावयास पाहिजे. अलिकडे बोधात्मक मानसशास्त्राच्या प्रभावामुळे अशा अभ्यासासाठी काही पध्दती उपलब्ध झालेल्या आहेत. उदा. १] प्रकट विचार २] उद्क्षिपित प्रत्यावहन ३] धोरण ग्रहण कृती ४] पत्रिका - पालन ५] संचय जाल तंत्र.

यापैकी प्रकट विचार व पत्रिका पालन यापध्दती पाठनियोजनाच्या विचार प्रक्रियांचा शोध घेण्यास अधिक उपयुक्त आहेत. या तंत्रावरील प्रकट विचार हे तंत्र पुढे थोडक्यात दिलेले आहे.

## प्रकट विचार :-

विद्यार्थी-शिक्षक पाठ नियोजन करीत असतांना त्याच्या मनात येणारे विचार प्रकट करणे किंवा अभ्यासक्रमा विषयी बोलताना येणारे विचार प्रकट करणे यांचा समावेश प्रकट विचार प्रक्रियेमध्ये होतो. [ क्लार्क व यिंगर १९८२ ] प्रकट केलेले हे विचार बहुदा ध्वनिमुद्रीत केले जातात किंवा क्वचित प्रसंगी ध्वनिचित्रमुद्रित केले जातात. व त्याचे चिन्हांकितीकरण केले जाते. हे चिन्हांकिती करण बहुदा संशोधक करतात. त्यामुळे शिक्षकांच्या विचारांचे वर्णन करता येते. तसेच नियोजनप्र निर्णय आणि अध्यापन या वेळी होणा-या विचार-प्रक्रियांचे क्रमवार वर्णन करता येते. विचार चालू असतांना मनामध्ये येणारा प्रत्येक विचार त्या व्यक्तिस तोंडावाटे प्रकट करावयास

सांगितले जाते. या काळात विचार थांबल्यास प्रश्न विचारून विचार पुढे चालू ठेवल्यास, प्रयोजक प्रयत्न करतो. किंवा विचारांची दिशा-चूक असल्यास योग्य प्रश्न विचारून त्या व्यक्तिस विचारांच्या दिशेने वाटचाल करण्यास मार्गदर्शन केले जाते.

[ क्लार्क व पीटर सन १९८६ ]

प्रकट विचार या तंत्राप्रमाणेच दुसरे तंत्र म्हणजे पत्रिका पालन हे ही पाठनियोजनाच्या संदर्भात महत्वाचे आहे. त्याची थोडक्यात माहिती पाहू :

पत्रिका पालन / लेखन :-

या पध्दतीचा शिक्षक विचारातील नियोजनाच्या अभ्यासामध्ये प्राथमिक उपयोग स्टॅनन [ १९८२ ] यांनी केला.

या पध्दतीत शिक्षकाला नियोजनाचा विकास कसा होत गेला याची लेखी नोंद ठेवावयास सांगितले जाते. आणि पुढील बाबींवर भाष्य लिखित स्वरूपात करावयास सांगितले जाते.

अ] ज्या संदर्भात त्यांनी नियोजन केले असेल.

ब] एखादी कृति निवडण्यामागील कारणे.

क] नियोजनाची वर्गात कार्यवाही केल्यानंतर त्याचे मूल्यमापन.

पत्रिका लेखन करताना त्या विद्यार्थी -शिक्षकांची वारंवार मुलाखत घेतली जाते. आणि त्यांना धीर दिला जातो व अनोळखी असलेल्या या प्रक्रिये बद्दल कांही शंका असल्यास त्यांचे निरसन करून पत्रिका लेखन पूर्ण करण्यास मदत केली जाते. ,आणि याचा उपयोग नियोजनाचा परिणाम करणा-या घटकांचे नमुने तयार करण्यावर होतो.

अशया पध्दतीचा वापर करुन विधार्थी शिक्षक पाठ नियोजन करीत असतांना कशा प्रकारच्या विचार प्रक्रिया चालू असतात याचा शोध घेता येऊ शकतो. याच दृष्टीकोनातून संशोधिकेने पुढील समस्या संशोधनासाठी निवडलेली आहे.

समस्येचे विधान :-

" पाठ नियोजन करीत असतांना विधार्थी - शिक्षकामध्ये चालू असणा-या विचार प्रक्रियांचा शोध".

**"AN INVESTIGATION INTO THOUGHT-PROCESSES OF STUDENT-TEACHER INVOLVED IN LESSON PLANNING"**

विशिष्ठ पदांच्या व्याख्या :-

१] पाठ नियोजन :- पाठनियोजनांत दोन गर्भितार्थ आहेत.

अ] नियोजन ही अशी विचार प्रक्रिया आहे की ज्यामध्ये व्यक्ति साधन सामुग्रीच्या सहाय्याने भविष्यकालीन कृतिसाठी मार्ग-दर्शन चौकट बनवून त्यातून भविष्यकाळ पहात असते.

ब] विधार्थी-शिक्षक जेव्हा ते नियोजन करीत आहेत असे म्हणतात तेव्हा त्या वेळच्या त्यांच्या सर्व कृति.

[क्लार्क आणि पीटर सन

प्रस्तुत अभ्यासासाठी वरील पैकी दुसरी व्याख्या निश्चित केली आहे.

गृहितके :- १] विचार प्रक्रिया या गर्भित[अंतर्गत] असतात.

२] <u>विद्यार्थी-शिक्षक</u> :-

शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या शिक्षण शास्त्र महाविद्यालयातील पदव्युत्तर शिक्षक - प्रशिक्षण घेणारे भावी शिक्षक म्हणजे विद्यार्थी- शिक्षक होय.

३] <u>विचार - प्रक्रिया</u> :-

शिक्षकांच्या विचार - प्रक्रियेच्या क्षेत्रात तीन प्रकारची वर्गवारी केली जाते.

अ] शिक्षकांच्या नियोजनाशी निगडीत विचार-प्रक्रिया.
उदा. कृतिपूर्व विचार.

ब] शिक्षकांच्या आंतर क्रियात्मक विचारांची विचार प्रक्रिया.
उदा. वर्ग अध्यापन आणि निर्णय.

क] शिक्षकांची मते आणि विश्वास.

[ क्लार्क आणि पीटरसन १९८८]

प्रस्तुत अभ्यास हा विद्यार्थी-शिक्षकांच्या कृतिपूर्व विचार यांच्याशी संबंधित आहे.

<u>गृहीतके</u> :-

१] विचार-प्रक्रिया या गर्भित[अंतर्गत] असतात.

विद्यार्थी - शिक्षकांच्या विचार प्रक्रिया ह्या शिक्षकांच्या विचार प्रक्रियांपेक्षा भिन्न असतात.

२] जेव्हा एखादी व्यक्ति एखाद्या विषयांशावर लघुस्मृतीच्या आधारे विचार करीत असते तेव्हा मौखिक अहवाल हे अत्यंत योग्य व विश्वसनीय असतात.

संशोधन विषयाचे महत्व :-

अध्यापक प्रशिक्षणाच्या कालावधीमध्ये विद्यार्थी-शिक्षकाला एकूण २० सराव पाठ घ्यावे लागतात. सराव पाठ घेण्यापूर्वी विद्यार्थी शिक्षकांना पाठ नियोजन करावे लागते हे पाठ नियोजन कसे करावे हे त्यांना हर्बार्टच्या पंचपदी प्रमाणे करावयास शिकवितात. पाठ-नियोजन करीत असताना त्या नुसार त्यांना विचार करावयास शिकविले जाते, व मार्गदर्शनही त्या प्रमाणेच केले जाते. पाठनियोजनात मार्गदर्शन देण्याचा हा दुवा अजूनही कच्चा आहे. त्यामध्ये प्राध्या-पकांनी दिलेली विचार प्रक्रियेची दिशा व विद्यार्थी-शिक्षकांच्या विचार-प्रक्रियेची दिशा एकच आहे की भिन्न आहे हे शोधून काढणे शक्य होईल.

सध्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून दिले जाणारे प्रशिक्षण हे पारंपारिक पध्दतीचे असून ते वर्तन वादावर आधारीत आहे. त्यामुळे शिक्षकांच्या बाह्य वर्तनाला महत्व दिले जाते. व त्यांच्या अंतर्गत कोणत्या विचार प्रक्रिया चालतात व त्यांचा परीणाम बाह्य वर्तनावर काय होतो हे पाहिले जात नाही. ते पहाणे महत्वाचे आहे. विचार प्रक्रियांचा बाह्य वर्तनावर निश्चित परिणाम होतो असे दिसून आल्या-नंतर त्याच्या सहाय्याने प्राध्यापक मार्गदर्शन करून विद्यार्थी-शिक्षकाच्या बाह्य वर्तनांत योग्य तो बदल घडवून आणू शकतील. त्या योगे अध्यापकाची परिणामकारकता वाढविता येईल. शिक्षक प्रशिक्षणाची

प्रक्रिया अधिक परिणाम कारक करता येईल.

## समस्येची व्याप्ती व मर्यादा :-

मूळत: हे संशोधन विद्यार्थी - शिक्षकांच्या वर्तनाशी संबंधित असल्याने शिक्षक प्रशिक्षणाच्या सर्व विविध स्तरांवर प्रवेश घेतलेले विद्यार्थी म्हणजे अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थी -शिक्षक, कनिष्ठ अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थी-शिक्षक, पदविका अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थी-शिक्षक, उच्च माध्यमिक अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थी-शिक्षक, दूर अध्ययन अध्यापक अध्ययन इ. चे विद्यार्थी-शिक्षक या सर्वांचा समावेश होऊ शकेल. तथापी सोयीसाठी हे संशोधन केवळ १९९०-९१ सालातील कै. बाळासाहेब खरोडे शिक्षण शास्त्र महाविद्यालयातील १५ विद्यार्थीपुरते मर्यादित ठेवले आहे. या अभ्यासासाठी खालील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रस्तुत समस्या निवडलेली आहे.

## संशोधनाच्या अभ्यासाची उद्दिष्टे :-

१] पाठ नियोजनात व्यस्त असणा-या विद्यार्थी-शिक्षकांच्या विचार प्रक्रियांचा शोध घेणे.

२] विद्यार्थी-शिक्षकांच्या विचारांचा अनुक्रम निश्चित करणे.

३] एक रेषीय प्रतिमान व विद्यार्थ्यांच्या विचारांच्या क्रमांचा तौलनिक अभ्यास.

४] पाठ नियोजनातील विचार प्रक्रिया व वर्तन यांचा तौलनिक अभ्यास.

५] संशोधन निष्कर्षाचे पाठनियोजनाच्या दृष्टीने महत्त्व निश्चित करणे.

परिकल्पना :-

प्रस्तुत संशोधन हे शोधक स्वरूपाचे असल्याने येथे कोणतीही परिकल्पना पडताळून पाहिली जाणार नाही.

प्रकरणीकरण :-

या अहवालातील प्रकरण योजना खालील प्रमाणे आहेत -

१] पार्श्वभूमी

२] संशोधन विषयाची संबंधीत साहित्याचा आढावा.

३] पथदर्शक प्रकल्प व संशोधन पध्दती.

४] सामुग्रीचे विश्लषण व परिक्षण.

५] सारांश निष्कर्ष व शिफारसी.

---